REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ५ जानेवारी, १९४४ अंक १

"मॅनेजर पाहिजे."

बँकिंगच्या कामाची संपूर्ण माहिती असणारे, अनुभविक अशांनीं व बी. कॉम अगर जी.डी.ए. अगर जी. डी. सी. अशांनीं लायसन्सच्या सर्टिफिकेटासह आपले अर्ज खालील पत्त्यावर तारीख २०।१।४४ चे आंत पाठवावेत. पगार लायकीप्रमाणें देण्यांत येईल.

(सही) श्री. सि. पाटील,
चेअरमन

शनिवार, ७२३ सातारा जिल्हा लो. बो. प्राथमिक
सातारा, शहर. शिक्षक सहकारी बँक लि० सातारा

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

ए. बी. सी. कॉइल्स
( डासांच्या उदबत्त्या )
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मागोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें २. —

महाराष्ट्र टेक्टाइलस् लि., यांच्या
राजा रघुनाथराव मिल्स भोर
येथील माल, धोतरजोड्या, शर्टिंग, कोटिंग, मांजरपाट पुण्यांत कंट्रोल भावानें घाऊक व किरकोळ
मिळण्याचें ठिकाण—पायोनियर डाइंग हाऊस
दातेवाडी, भिकारदास मारुती रोड, सदाशिव पेठ, पुणें.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### मृत्यूचें मारिणाम

जपान्यांचे हातीं असलेले अमेरिकन कैदी दरसाल दर-हजारी ५० ह्या प्रमाणांत मरण पावत आहेत.

### विजेच्या बिलांत वाढ करण्याची परवानगी

विजेच्या उत्पादनासाठीं वाफेचा उपयोग करणाऱ्या कंपन्यांना आपल्या गिऱ्हाइकांच्या विजेच्या बिलांत मुंबई सरकारच्या पूर्व संमतीनें १०% पर्यंत वाढ करण्याची परवानगी देण्यांत आली आहे.

### करमणुकीवरील करांत वाढ

मुंबई सरकारनें करमणुकीवरील करांत खालीलप्रमाणें वाढ केली आहे, ती १ जानेवारी १९४४ पासून अमलांत आली.

| तिकिटाची निवळ किंमत | करमणुकीचा कर |
|---|---|
| ४ आण्यांपर्यंत | १ आणा |
| ८ आण्यांपर्यंत | २ आणे |
| १ रुपयापर्यंत | ४ आणे |
| २ रुपयांपर्यंत | ८ आणे |
| ४ रुपयांपर्यंत | १ रुपया |
| ५ रुपयांपर्यंत | १½ रुपया |
| १० रुपयांपर्यंत | २ रुपये |

दहा रुपयांवरील प्रत्येक ५ रुपयांस २ रुपये कर आहे. ब्रिटिश व मित्रराष्ट्रांच्या मिलिटरी लोकांना पहिल्या चार आण्यांपर्यंतच्या तिकिटांवरील कराची माफी आहे. ४ आण्यांपेक्षा जास्त परंतु ८ आण्यांपर्यंतच्या तिकिटांवरील करांत १ आण्याची माफी मिळेल. रेस कोर्सच्या तिकिटाच्या किंमतीवरील २५% कर हा सर्वांनाच लागू आहे.

### चीनचें उज्ज्वल भवितव्य

चीनची लोकसंख्या प्रचंड असून तेथील कामगार कुशल कारागीर आहेत. त्या देशांत कच्च्या द्रव्यांचा पुरवठाहि मुबलक आहे. तथापि, जमिनींतून कमाल उत्पादन काढण्यास व कच्च्या मालाचे पक्के जिन्नस करण्यास लागणारी यंत्रसामुग्री व भांडवल चीनजवळ नाहीं. युद्धसमाप्तीनंतर, अमेरिकेंतील कारखानदार आपली जुनी यंत्रसामुग्री चीनमध्यें नेऊन बसवितील, असा रंग दिसत आहे. चीनला परराष्ट्रीय भांडवलाचें प्राबल्य रुचणार नाहीं. चिनी व विदेशी लोक ह्या दोघांचा मिळून तेथील कारखान्यांत गुंतलेल्या भांडवलावर ताबा असावा, असा चीन प्रयत्न करील. कांहीं काळाचे अवधींत, चीन हा एक प्रबळ औद्योगिक देश होण्याचा संभव आहे, असें अलेक्झँडर हॅमिल्टन इन्स्टिट्यूट ऑफ अमेरिका ह्या संस्थेचें मत आहे.

### नॅशनल सेव्हिंग्ज बँक लि.

वरील बँकेस तिच्या दुसऱ्या वर्षी १,०१,९८७ रुपये निवळ नफा झाला व भागीदारांस ६% करमाफ डिव्हिडंड मिळालें.

### हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

| | सप्टेंबर १९४२ | सप्टेंबर १९४३ |
|---|---|---|
| | गांठी | ( १ गांठ ४०० पौंड ) |
| ब्रिटिश हिंदुस्थान | २,४४,९६५ | ३,००,२७२ |
| हिंदी संस्थानें | ५४,०३५ | ६०,०९७ |
| एकूण | २,९९,००० | ३,६०,३६९ |

### चांदी-सोनें

बॉंबे बुलियन एक्स्चेंजनें गेल्या वर्षी २,६६,०९,२६० तोळे चांदी व १,६३,४७१ तोळे सोनें वितळवून त्याचे पाटले केले. ३ मे, १९४३ रोजीं चांदी-सोन्याच्या भावांनीं उच्चांक गाठला. सोन्याचा दर तोळयास ९७ रुपये व चांदीचा दर १०० तोळयास १३९ रुपये त्या दिवशीं झाला.

### नेगेरियाशीं व्यापार कसा वाढेल !

ग्रेट ब्रिटनच्या आफ्रिकन वसाहतींची लोकसंख्या ६ कोटि असून त्यांतील २ कोटि लोक नेगेरियामध्यें आहेत. त्यांपैकी शेकडा ८० ते ९० लोक शेतीवर उपजीविका करतात. आयात होणाऱ्या जिनसांची त्यांस माहितीहि नाहीं. सहाजीकच, नेगेरियाची आयात फारच कमी आहे व येणारा माल तद्देशीयांत खपत नाहीं. स्थानिक लोकांच्या गरजा वाढवून त्या भागविण्यासाठीं ते अधिक मेहनत करून जास्त मजुरी मिळविण्यास उत्सुक होतील किंवा नाहीं, ह्यावर तेथील बाजारपेठेचें महत्त्व अवलंबून राहील, असें सर डोनाल्ड कॅमेरॉन ह्यांचें मत आहे.

### धान्याचें उत्पादन वाढविण्यासाठीं ३० लक्ष रुपये खर्च

मुंबई सरकार "अधिक धान्य पिकवा" मोहिम यशस्वी करण्यासाठीं १९४४-४५ मध्यें बियांची खरेदी, साठवण व विक्री करण्याकरितां ३० लक्ष रुपये खर्च करणार आहे. बी वाटण्याच्या योजनेमुळें ८० लक्ष रुपयांचें १० लक्ष धान्य जास्त पिकेल, असा अंदाज आहे. ३० लक्ष रुपयांपैकी ७½ लक्ष रुपये परत वसूल होणार नाहींत. सरकारच्या शेती खात्यानें बियासाठीं धान्य विकत घ्यावयाचें, त्यासहि किंमतीचें नियंत्रण लागू आहे परंतु विशेष निवडक बियांसाठीं १२½% पर्यंत जास्त किंमत देण्यास त्यांस मुभा आहे.

### परस्पर विरोधी युद्धोत्तर योजना

"गेल्या अठरा महिन्यांत, ग्रेट ब्रिटनमध्यें युद्धोत्तर योजना आखण्यांत कितीतरी शक्ति निष्कारण खर्च झाली आहे. युद्धानंतरच्या काळांत व्यापार व उद्योगधंदे ह्यांचेकडे लक्ष फारच थोडया योजनांत दिलेलें आढळतें. कोटयवधि रुपयांच्या सरकारी खर्चावरच बहुतेक योजना आधारलेल्या आहेत, परंतु पैसे येणार कोठून ह्याकडे कोणाचें लक्ष आहे ? नियोजकांत बहुंशीं कॉलेजचे प्रोफेसर, शास्त्रीय सोसायट्यांचे सभासद, सरकारी नोकर, वगैरेंचाच भरणा आहे; त्यांपैकी कोणासच मजुरांच्या व नोकरांच्या पगाराची तरतूद करण्याचें माहीत नाहीं. जाहीर झालेल्या योजना परस्पर विरोधी आहेत, हें राष्ट्रीय हिताचे दृष्टीनें एकपरी बरेंच आहे." मि. फ्रँक ह्यूंची ह्यांचा न्यूयॉर्क जर्नल ऑफ कॉमर्समधील लेख.

### कॉसमॉस को. बँकेच्या इमारतीचें उद्घाटन

कॉसमॉस को. अर्बन बँक लि. च्या कुंटे चौक, लक्ष्मीरोड, पुणें, येथील नव्या इमारतीचा उद्घाटन समारंभ रविवार, ता. २ जानेवारी रोजीं श्री. न. चिं. केळकर ह्यांचे हस्तें झाला. त्यासंबंधीं विस्तृत माहिती मागाहून देण्यांत येईल.

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटनें २ लक्ष रुपयांचा चेक दिला

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. नें डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नवीन कॉमर्स कॉलेजसाठीं २ लक्ष रुपयांची देणगी देण्याचें ठरविलें, त्याप्रमाणें २ लक्ष रुपयांचा चेक सोसायटीकडे पाठविण्यांत आला आहे, असें समजतें.

X.2m, N35
M4
162618

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... २ |
| २ हिंदी शेतीची सुधारणा | ... ३ |
| ३ वाहतुकीच्या साधनांसाठी परावलंबन नको | ... ४ |
| ४ स्फुट विचार<br>१९४४ सालाच्या युद्ध-विषयक अपेक्षा—मद्रासची अर्थशास्त्रीय परिषद्—भौतिक शास्त्रें आणि राष्ट्रीय प्रगति | ... ५ |
| ५ हिंदी लोकांचें आरोग्य | ... ६ |
| ६ कारखान्यांच्या सक्तीच्या विम्याची मुदतवाढ | ... ६ |
| ७ म्हैसूर संस्थानची ग्रामोद्धार योजना | ... ७ |



# अर्थ

बुधवार, ता. ५ जानेवारी, १९४४


## हिंदी शेतीची सुधारणा

### सर मणीलाल नानावटी ह्यांचे विचार

युद्धोत्तर काळांत व्हावयाच्या आर्थिक पुनर्घटनेच्या योजना आखून सरकारनें त्यांच्या अंमलबजावणीची तयारी केली पाहिजे आणि विशेषतः शेतीच्या धंद्याची मूलग्राही सुधारणा करण्याच्या हेतूनें सहकारी संघटनाचा अधिकांत अधिक उपयोग करून घेतला पाहिजे असें आम्हीं " अर्था " च्या गेल्या अंकांत प्रतिपादलें होतें. शेतीच्या पुनर्घटनेविषयीं महत्वाचे उद्गार सर मणिलाल नानावटी, रिझर्व्ह बँकेचे माजी डेप्युटी गव्हर्नर, ह्यांनीं वालचंदनगर येथें नाताळांत भरलेल्या शेतीच्या अर्थशास्त्रास वाहिलेल्या " इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स " ह्या अलीकडे स्थापन झालेल्या संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष ह्या नात्यानें काढले, त्यांच्याकडे येथें लक्ष वेधावयाचें आहे. जीवनास अत्यावश्यक असलेलें अन्न आणि उद्योगधंद्यांस जरूर असलेली कच्ची सामुग्री ह्यांचा उगम आणि बहुसंख्य हिंदी जनतेच्या निर्वाहाचें एकमेव साधन ह्या नात्यांनीं शेतीचें महत्व असामान्य आहे. तथापि, त्या धंद्याच्या स्थितीविषयींच्या प्रश्नांचा शास्त्रीय पद्धतीनें विचार करून ते सोडवण्याचे मार्ग सुचवण्याचें कार्य आस्थेनें व पद्धतशीरपणानें व्हावें तसें आजपर्यंत झालेलें नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. शेतीची जमीन आणि पिकें ह्यासंबंधांत शास्त्रीय प्रयोग झाले आहेत आणि होत आहेत आणि इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें बरीच फलप्रद कामगिरी चालवली आहे. परंतु शेतीच्या स्थितीची व्यापक आर्थिक दृष्ट्या चर्चा झाल्यावांचून आणि आर्थिक संशोधनातून निघणाऱ्या निर्णयांस अनुसरून ह्या धंद्याच्या सुधारणेसाठी संघटनात्मक उपाययोजना झाल्यावांचून प्रगतीचें उद्दिष्ट साध्य होणें अशक्य आहे. व्यापक आणि तपशीलवार आर्थिक संशोधनाची व चर्चेची सध्याची उणीव शेती-अर्थशास्त्राच्या अभ्यासास वाहिलेल्या इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स ह्या संस्थेकडून भरून काढली जात आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे.

सर मणीलाल ह्यांनीं आपल्या भाषणांत ह्या संस्थेचे उद्देश व कार्य ह्यांचेविषयीं माहिती दिली तीवरून तिच्याकडून हळुहळु भरीव कार्य होईल असें वाटण्यास जागा आहे. शेतीचें उत्पन्न वाढवण्याचे आजपर्यंत करण्यांत आलेले प्रयत्न विशेष फलद्रुप झालेले नाहींत आणि हिंदी समाजाचें रहाणीचें मान असमाधानकारक राहिलें आहे असें त्यांचें मत आहे. धान्य पुरवठा वाढवण्याविषयींच्या मोहिमेसहि म्हणण्यासारखें यश आलेलें नाहीं आणि मध्यवर्ती सरकारनें योजनात्मक आर्थिक धोरण अमलांत आणल्यावांचून इच्छित प्रगति होणें शक्य नाहीं असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक दुबळेपणाचीं प्रमुख कारणें सर मणीलाल ह्यांच्या मतानें वाढती लोकसंख्या, वाढतें जमीनदारांचें प्राबल्य, शेतांचें क्षेत्र लहान होण्याची प्रवृत्ति, शेतांचे होणारे तुकडे, जमीनींचें घटणारें उत्पादन सामर्थ्य, शेतकरी वर्गाची अपुरी प्राप्ति व कर्जबाजारीपणा, खेडेगावीं धंद्यांचा ऱ्हास, मोठ्या प्रमाणावरील धंद्यांचा मागसलेपणा, यंत्रसामुग्रीच्या व मूलग्राही कारखान्यांचा अभाव, हीं आहेत. युद्धपरिस्थितीमुळें हीं कारणें ठळकपणानें दृष्टोत्पत्तीस येत आहेत. हिंदुस्थानांत नैसर्गिक परिस्थिति अनुकूल आहे; पण तिचा योग्य फायदा मानवी प्रयत्नानें घेतलेला नाहीं. सामाजिक व आर्थिक घडी सदोष असून सरकारचें धोरण सहायक नाहीं ह्यामुळें ह्या देशाची शेतीविषयक प्रगति झालेली नाहीं. ह्यासाठी सरकारनें पुढाकार घेऊन पुनर्घटनेची योजना आखावी, तिच्यासाठी तज्ञ नेमावे व पैसे पुरवावे असें सर मणीलाल ह्यांनीं सुचवलें. अमेरिकेंत मध्यवर्ती सरकारनें आर्थिक प्रगतीचे प्रश्न स्वतःच्या हातीं घेतले असून शेतीच्या धंद्यास सहाय दिलें आहे. तेथील प्रांतिक सरकारें आपल्या स्वतंत्र हक्काविषयीं विशेष जागृत असूनहि मध्यवर्ती सरकारास असें धोरण अंगिकारणें आवश्यक वाटतें तर हिंदुस्थानासारख्या देशांत त्याचें अनुकरण करणें किती अगत्याचें आहे हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. हिंदुस्थान सरकारास योजनात्मक आर्थिक पुनर्घटनेच्या महत्वाची जाणीव झाली आहे, पण करावयाचें कार्य एवढें मोठें आहे कीं त्या दिशेचा कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर व्हावा लागेल.

शेतीच्या प्रगतीसाठी सुधारणा तीन मार्गांनीं होण्याची आवश्यकता सर मणीलाल ह्यांनीं प्रतिपादली. ( १ ) जमीनधारणाची पद्धति, ( २ ) कर व ( ३ ) कारभार ह्या तीन बाबींमध्यें सुधारणा झाली पाहिजे असें त्यांनीं सुचवलें. जमीनीचे तुकडे होत चालले आहेत आणि शेतांची मशागत करण्याचें सामर्थ्य शेतकऱ्यांमध्यें राहिलेलें नाहीं. जमिनदारीच्या प्रांतांत शेत करणारांस प्राप्ती एवढी अल्प होते कीं त्यांच्यामध्यें आर्थिक किंवा शारीरिक त्राण दिसून येत नाहीं. रयतवारी पद्धतीच्या प्रांतांतहि जमिनी शेतकऱ्यांच्या हातांतून इतर वर्गाच्या हातीं चालल्या असल्यानें शेताची नीट निगा होत नाहीं. स्वतःच्या मालकीचीं शेतें करणाऱ्या लोकांच्या हातीं हा धंदा राहील अशी व्यवस्था सरकारनें कायद्यानें व द्रव्यसहायानें केली पाहिजे असें सर मणीलाल ह्यांचें म्हणणें आहे. शेतसारा ठरवणें व गोळा करणें ह्यांविषयींची सध्याची पद्धति सदोष आहे आणि शेतकऱ्यांवर पडणारा बोजा हलका होणें आवश्यक आहे असें त्यांचें मत आहे. खेडेगावांच्या कारभारांत आमूलाग्र सुधारणा होण्याच्या इष्टतेवरहि त्यांनीं जोर दिला आहे. सरकारी अधिकाऱ्यांत उत्साहाचा अभाव असतो आणि लोकांची प्रवृत्ति सुधारणेस अनुकूल नस-

त्याचें दिसत नाहीं. प्रत्येक खेड्यांत शाळा, पंचायत व सहकारी संस्था असली पाहिजे अशी त्यांची सूचना आहे. ही सहकारी संस्था मल्टिपर्पज सोसायटीच्या स्वरूपाची असावी आणि तिनें शेतकऱ्याच्या सर्वंद जीवनाचा परामर्श घ्यावा. सामान्य जनतेस शिक्षण देऊन स्वतःची उन्नति घडवून आणण्यास तिला समर्थ केलें पाहिजे. देशाची सर्वांगीण आर्थिक प्रगति होईल अशी व्यवस्था झाली नाहीं तर केवळ शेतीचीच प्रगति होणें कठीण आहे असें सर मणीलाल ह्यांचें मत् असल्यानें सरकारनें ह्यासंबंधांत योजना आखून ती पुरी करण्याची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली पाहिजे असें त्यांनीं आमह्यानें सांगितलें आहे.

---

## वहातुकीच्या साधनांसाठी परावलंबन नको

(हिंदुस्थानांत पक्के, मोटारचे हमरस्ते बांधण्याच्या आवश्यकतेचा प्रचार चालू आहे, त्याची दुसरी बाजू श्री. स. सी. नाईक, बी. ए., बी. एससी., एल. सी. ई. ह्यांनीं "खेडेगावास जाणाऱ्या रस्त्यांची योजना" ह्या आपल्या लेखांत मांडली आहे. त्याचा महत्त्वाचा भाग येथें उद्धृत केला आहे.)

सबंध हिंदुस्थानासाठी पक्के मोटरचे (आस्फाल्टचे) रस्ते पाहिजेत; त्यांपैकीं एक भाग म्हणून खेड्यांच्या पक्क्या रस्त्यांची योजना करा व ही योजना युद्धोत्तर सुधारणा म्हणून दर प्रांतास लागू करा असा प्रचार जो केला जात आहे तो आजच्या व आणखी पांचपंचवीस वर्षें पुढें पर्यंत दिसत असलेल्या आपल्या परिस्थितीप्रमाणें आमच्या हिताचा नाहीं असें आम्हांस वाटतें. आजपर्यंत सरकारनें हातीं घेतलेला मध्यवर्ती व दुय्यम रस्त्यांचा प्रश्न इतका महत्त्वाचा, खर्चाचा व व्यापक निघाला कीं इतर रस्त्यांच्या प्रश्नांस हात घालण्यास सवड झाली नाहीं. लढाईच्या परिस्थितींतील अडचणीमुळें खेड्यांच्या रस्त्यांची उणीव भासली व ते विचाराच्या कक्षेंत आले. त्यांच्या योजना करतांना त्या सयुक्तिक व ग्राह्य असल्या पाहिजेत. प्रमुख रस्ते व खेड्यांचे रस्ते यांपैकीं प्रत्येकास त्याचें योग्य तें स्थान दिलें पाहिजे. कारण ते एकमेकांस पोषक आहेत ही जाणीव पाहिजे.

दळणवळणाचे मार्ग म्हणजे रेल्वे व रस्ते; त्यासाठी वाहनें म्हणजे रेलगाड्या व इंजिनें; मोटारी व गाड्या, आगबोटी व तारवें होड्या वगैरे व विमानें; या सर्वांसाठी लागणाऱ्या वस्तू अगर माल, व शेवटीं शक्ति उत्पादन करण्यासाठी लागणारा कोळसा, तेल अगर वीज हीं सर्व शांतता नांदत असतां अगर लढाईच्या वेळीं आवश्यक जरूरीच्या वस्तूंमध्यें (Essential services and requirements) अग्रगण्य समजलीं पाहिजेत. कारण तीं मनुष्याच्या जीवनास व बचावास पदोपदीं लागणारीं असल्यामुळें प्रत्येक गोष्ट व वस्तू यांवर अवलंबून असते. या सर्वांमध्यें पूर्ण स्वावलंबन पाहिजे तरच राष्ट्र राष्ट्रीयत्वाप्रत पोहोंचेल. हीं सर्व साधनें अगर वस्तू राष्ट्रीय सरकारच्या मालकीच्या अगर हुकमतींतल्या पाहिजेत व शक्य तितक्या नजीक तयार झाल्या पाहिजेत.

आपली परिस्थिति या कामांत केविलवाणी आहे. रस्त्यांसाठी व रेल्वेसाठी लागणारी माती, मुरुम, खडी, चुना हीं येथील आहेत; कारण तीं बाहेरून आणतां येतच नाहींत. आजकाल सिमेंट हिंदुस्थानांत होतें, रेल्वेचे कांहीं रेल टाटानगरच्या कारखान्यांत होतात. जवळ जवळ येथें ही यादी संपली. रस्त्यांसाठी आस्फाल्ट ब्रह्मदेश, इराण अगर अमेरिकेंतून येतें. रेलगाड्या व इंजिनें इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी अगर अमेरिका या देशांत आमच्यासाठी तयार होतात. विमानें तशींच. मोटारी यांहीपेक्षां जास्त देशांतून फार तर काय बेल्जियम, इटाली इत्यादि लहान देशांतूनही येतात. त्यांसाठी लागणारीं उपकरणें व लहान भाग त्याच देशांतून घेणें भाग आहे.

कोळसा कांहीं या देशांत, बिहार व मध्यप्रांत या ठिकाणी थोडासा मिळतो. तो अतिशय अपुरा आहे व मुंबई, कराचीसारख्या बंदरांत व मुख्य कारखान्यांच्या ठिकाणीं परदेशांतून आलेल्या कोळशापेक्षांही महाग पडत असे अशी आमची समजूत आहे. कोळशाचे कारखानदार मालक, वहातुक करणाऱ्या रेल्वे व सरकार यांचा एकसूत्रीपणा नसल्यामुळें देशांतील कोळसा देशांत महाग पडत असे. लोखंड व पोलाद यांतही हीच अडचण असल्यामुळें टाटानगरचा कारखाना मदत देऊन पोसावा व जगवावा लागला.

पेट्रोल, क्रूड ऑइल, लुब्रिकेटिंग तेलें वगैरे सर्वच बाहेर देशांतून येतात. साखरेच्या कारखान्यांत फुकट जाणाऱ्या टाकाऊ मालापासून पॉवर अल्कोहॉल करण्याची परवानगी नसे, ती आतांशी मिळूं लागली आहे. ब्रह्मदेश, इराण, रशिया, अमेरिका वगैरे देशांतून हें जळण येत असे. वीज तयार करण्याचीं यंत्रें व त्यांचे भाग जबर किंमतीस बाहेरून आणावे लागत असल्यामुळें दोन-चार पै युनिट मूळ किंमतीची वीज आम्हांस दुप्पट चौपट किंमतीस तयार होते. ट्यूब, टायर व इतर सर्व कामासाठी लागणारा रबर मलाया, डच ईस्ट इंडीज वगैरे परदेशांतून घ्यावा लागत असे. अशा तऱ्हेनें सर्व बाबतींत आमचें आज परावलंबन आहे. लढाईच्या परिस्थितीमुळें कोणतीच वस्तू मिळत नसल्यामुळें जी आपणांवर आपत्ति कोसळत आहे ती पाहून तरी आमचे डोळे उघडतील अशी आशा आहे. ही सर्व सामुग्री शुद्ध स्वदेशी पाहिजे, कारखानेही आपल्या भांडवलाचे, आपल्या मालकीचे व आपल्या हुकमतीखालीं चालणारे पाहिजेत. अक्कलहुषारी असणारे तज्ज्ञ लोक व सर्व कामगारवर्ग आपला पाहिजे. तयार मालास लागणारे सर्व दुय्यम पदार्थ ट्यूब, टायर, मॅग्नेटो वगैरे सर्व आपल्याकडेच तयार होणारीं पाहिजेत. राष्ट्रीय हिंदुस्थान सरकारची या सर्व कारखान्यांवर मेहेरनजर पाहिजे. इतर सर्व देश या तत्त्वाचा पुरस्कार करतात व शांतता व लढाई असतांनाही आपला देश मजबूत बनवितात. आपण मात्र आजवर बेफिकीर राहिलों. यापुढें असेच राहिलों तर पूर्ण परावलंबी व निरुपयोगी बनून जाऊं. त्याचप्रमाणें दळणवळणाचे मार्ग, त्यांचीं वाहनें इत्यादि सर्व राष्ट्रीय हिंदुस्थानाच्या हुकमतीखालीं पाहिजेत.

---

### रेशन ज्यास्त मिळावें, म्हणून दातांच्या कवळीची चोरी

आपल्या स्वतःच्या वाट्यास रेशन ज्यास्त यावें, ह्यासाठी शिकागो येथील एका मनुष्यानें आपल्या पत्नीची कृत्रिम दातांची कवळी चोरली, हेतु हा कीं तिला खातां आलें नाहीं म्हणजे तिचें रेशन त्याला खायला मिळेल! पत्नीनें घटस्फोट मागतेवेळीं कोर्टांत ही हकीकत सांगितली, तेव्हां कोर्टानें घटस्फोट मंजूर करून दातांची कवळी पत्नीस परत देवविली.

# स्फुट विचार

## १९४४ सालाच्या युद्धविषयक अपेक्षा

ख्रिस्ती शकाच्या नूतन वर्षाचे प्रारंभीं मित्रराष्ट्रांच्या आणि जर्मनी व जपान ह्या शत्रुराष्ट्रांच्या पुढाऱ्यांनीं येत्या बारा महिन्यांत युद्धास कसें वळण लागेल ह्या विषयीं स्वतःच्या आशा व अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. नुकतेंच चालू झालेलें वर्ष हा प्रस्तुत युद्धांतला निर्वाणीचा कालखंड ठरणार ह्याची जाणीव सर्वांस आहे. युरोपांत दुसऱ्या आघाडीची तयारी इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या सैन्याधिकाऱ्यांनीं केली आहे ह्याविषयींची माहिती प्रसिद्ध झालीच आहे. रशिया जर्मन फौजास झपाट्यानें पोलंड, रुमानिया व बाल्टिक समुद्र ह्यांच्या सरहद्दीकडे रेटीत आहे आणि पूर्व आघाडीवर शत्रूस कोठेच टिकाव धरतां येईनासा झाला आहे. इटलीमध्यें ब्रिटिश व अमेरिकन सैन्यांची मंदगतीनें पण निश्चितपणानें प्रगति चालली आहे. मित्रराष्ट्रांच्या विमानांच्या प्रचंड आघातांनीं जर्मनीच्या प्रमुख शहरांचा चुराडा होत आहे. ह्या सर्व परिस्थितीवरून एकच सिद्धांत निघतो आणि तो हा आहे कीं, मित्रराष्ट्रांस १९४४ सालांत जर्मनी विरुद्ध निर्णायक विजय प्राप्त होण्याचीं अनुकूल चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. ब्रिटिश व अमेरिकन मुत्सद्यांच्या व सेनानींच्या नवीन वर्षविषयक संदेशांत व उद्गारांत आशावादाचा व उत्साहाचा ध्वनी उमटणें ह्यामुळें स्वाभाविक व समर्थनीय आहे, पण जर्मनी व जपान ह्यांच्या वतीनें नवीन वर्षांतील युद्धाच्या हालचालींविषयीं भविष्यें वर्तवण्यांत येत आहेत आणि आश्वासनें देण्यांत येत आहेत तीं कशाच्या आधारावर उभारलेलीं आहेत हें त्यांस स्वतःच सांगतां येणें अशक्य आहे. प्रत्यक्ष रणांगणांकडे पाहिलें असतां शत्रुराष्ट्रांस सर्वत्र थपडाच खाव्या लागत आहेत. लढाऊ सामर्थ्याचे संबंधांत इंग्लंड व अमेरिका ह्यांचा शस्त्रास्त्रांचा पुरवठा सारखा वाढत आहे आणि जर्मनी व जपान ह्यांस त्यांचा तुटवडा भासत आहे ह्या गोष्टी स्पष्ट आहेत. म्हणून जर्मनी व जपान ह्यांच्या प्रचारकांचा आत्मविश्वास केवळ दिखाऊ आहे ह्यांत शंका नाहीं. ह्याच्या उलट, मित्रराष्ट्रांचा उत्साह साधार आहे तरीहि त्यांच्या प्रतिनिधींची भाषा प्रौढीची नसून सावधगिरीची आहे हा फरक लक्षांत घेण्यासारखा आहे. शेवटची हार खाण्यापूर्वीं शत्रू पिसाटपणाच्या निकरानें लढेल आणि आपणास विजयाची भारी किंमत द्यावी लागेल ह्या जाणीवेनें आपण सर्वांनीं लढलें पाहिजे असें मित्रराष्ट्रांचे पुढारी सांगत आहेत हें दूरदृष्टी व्यवहार्यतेचें लक्षण आहे. नूतन सालांतली युद्धपरिस्थिति मित्रराष्ट्रांस निश्चितपणानें विजयाच्या ध्येयाजवळ नेईल अशी अनुकूल आहे आणि त्यांनीं आपला युद्धप्रयत्न अधिक नेटानें चालू ठेवला पाहिजे हें उघड आहे.

---

## मद्रासची अर्थशास्त्रीय परिषद

गेल्या नाताळांत हिंदी अर्थशास्त्रज्ञांची परिषद् मद्रासमध्यें डॉ. नारायणस्वामी नायडू ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. मद्रास विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलियार, ह्यांनीं परिषदेचें उद्घाटन केलें. ह्या दोघांच्याहि भाषणांत हिंदुस्थानच्या युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेविषयींचें विवेचन अग्रस्थानीं यावें हें उचितच होतें. अटलांटिक सनदेंत नमूद केलेल्या जागतिक पुनर्रचनेच्या योजनेस मूर्तस्वरूप प्राप्त झाल्यास पृथ्वीवर स्वर्ग अवतरल्यासारखें होईल असें म्हणून डॉ. लक्ष्मणस्वामी ह्यांनीं हिंदुस्थानांत उद्योगधंदे व शेती ह्यांची वाढ व सुधारणा कोणत्या रीतीनें होणें आवश्यक आहे ह्यासंबंधानें सूचनात्मक उद्गार काढले. अलीकडे सरकार व धंदेवाले ह्यांस अर्थशास्त्रज्ञांच्या सल्ल्याचें महत्व पटत चाललें आहे ह्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें आणि अर्थशास्त्रज्ञांनीं निःपक्षपातीपणानें आपला अभिप्राय देऊन आर्थिक प्रगतीस सहाय करावें असें ते म्हणाले. हिंदुस्थानची राजकीय घटना कोणत्याहि स्वरूपाची होवो, आर्थिक दृष्ट्या ह्या देशाचें धोरण एक राहिलें पाहिजे आणि ह्यासाठीं पुनर्रचनेची योजना, देशाचें असंडत्व व त्यांतील घटकांचें संवादित्व दृढमूल होईल अशा प्रकारची बनवणें अगत्याचें आहे असें आपलें मत त्यांनीं दिलें. परिषदेचे अध्यक्ष, डॉ. नारायणस्वामी नायडू, ह्यांनीं युद्धोत्तर काळांतील हिंदुस्थानांत कोणत्या पद्धतीनें आर्थिक पुनर्घटना झाली पाहिजे ह्याचें दिग्दर्शन केलें आणि ह्या देशापुढें येणाऱ्या महत्वाच्या आर्थिक प्रश्नांची चर्चा केली. हिंदी जनतेच्या दारिद्र्याचें व दुस्थितीचें निर्मूलन होण्यास स्वदेशी उद्योगधंदे, व्यापार व शेती ह्यांच्या उन्नतीस राष्ट्रीय सरकारास मदत करावी लागेल. युद्ध चालू असतांना सरकार आर्थिक व्यवहारांत कार्यक्षमता व उत्पादकता ह्यांचे दृष्टीनें हस्तक्षेप करीत आहे. युद्ध संपतांच हें धोरण त्यास एकदम सोडून देतां यावयाचें नाहीं. हिंदुस्थानासारख्या मागसलेल्या व दरिद्री देशांत आर्थिक प्रगतीचे बाबतींत राष्ट्रीय सरकारनें उदासीनतेची भूमिका घेऊन भागणार नाहीं. अशा रीतीनें सरकारनें करावयाच्या आर्थिक क्षेत्रांतील कर्तव्यावर डॉ. नारायणस्वामी ह्यांनीं जोर दिला. युद्धकालांतील आर्थिक नियंत्रणें, बँकिंगच्या धंद्याचें नियमन, चलन इत्यादि महत्वाच्या विषयांचीहि चर्चा मद्रासच्या परिषदेनें केली.

---

## भौतिक शास्त्रें आणि राष्ट्रीय प्रगति

भौतिक शास्त्रांच्या अभ्यासास वाहिलेल्या सुप्रसिद्ध रॉयल सोसायटीची सभा दिल्ली येथें परवा म्हणजे सोमवारीं भरली आणि त्या बरोबरच हिंदी सायन्स काँग्रेसचें अधिवेशन झालें. गेल्या दोनशें वर्षांत तिच्या स्थापनेपासून आतांपर्यंत रॉयल सोसायटीची सभा इंग्लंडच्या बाहेर कधींही झाली नव्हती. प्रस्तुत योगायोग ह्या कारणासाठीं अपूर्व गणला पाहिजे. व्हाइसरॉय व्हायकौंट वेव्हल, ह्यांनीं उद्घाटन प्रसंगीं भाषण करतांना हिंदुस्थानांत गेल्या पंचवीस वर्षांत भौतिक शास्त्रांच्या अभ्यासांत झालेल्या प्रगतीचा गौरवपूर्ण उल्लेख केला आणि विश्वविद्यालयें व शास्त्रीय मंडळें ह्यांनीं चालवलेल्या कार्याकडे बोट दाखवलें. भौतिक शास्त्रज्ञांचा युद्ध–सामुग्री व शस्त्रास्त्रें ह्यांचे संबंधांत सुधारणा होण्यास मोठा उपयोग झालेला आहे असें त्यांनीं सांगितलें. युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानच्या आर्थिक उन्नतीस शास्त्रीय शोधांची मदत होणें इष्ट आहे असें म्हणून लोकांचें ह्या विषयाकडे अधिकाधिक लक्ष लागेल अशी आशा त्यांनीं प्रदर्शित केली. पारमार्थिक कल्याण व आर्थिक उन्नति ह्यांची सांगड घातली गेली पाहिजे आणि भौतिक शास्त्रांच्या व्यावहारिक उपयुक्ततेस ह्या देशांत पुष्कळ वाव आहे असें व्हाइसरॉय म्हणाले. ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं आपल्या संदेशांत आधुनिक शास्त्रीय शोधांचा दुरुपयोग मानवी संस्कृतीचा नाश करण्यांत होतो, पण तो बंद पाडून त्यांचा सदुपयोग शांतता व प्रगति ह्यांचेप्रीत्यर्थ आपण केला पाहिजे असें म्हटलें होतें. हिंदुस्थानांत चाललेल्या शास्त्रीय शोधांच्या प्रगतीचा अभिनंदनात्मक निर्देश फिल्ड मार्शल स्मटस ह्यांनीं धाडलेल्या संदेशांत होता आणि ह्या देशाच्या नैसर्गिक साधनांचा विनियोग शास्त्रीय पद्धतीनें केला जाऊन येथील जनतेची उन्नति घडून यावी अशी इच्छा प्रदर्शित करण्यांत आली होती.

### हिंदी लोकांचें आरोग्य

रॉकफेलेर्स फौंडेशनच्या इंटरनॅशनल हेल्थ विभागाचे डॉ. जॉन बी ग्रँट ह्यांनीं हिंदुस्थानांतील आरोग्यावरील आपला रिपोर्ट तयार केला आहे, त्यांत नमूद केलेल्या गोष्टींवरून हिंदुस्थानांतील ह्या संबंधांतील परिस्थितीवर प्रकाश पडतो. ते म्हणतात: "हिंदुस्थानांतील ४० कोटि लोकांस उपचार करण्यासाठीं ४२ हजार डॉक्टर (त्यांतील २८ हजार सरकारी परवान्याचे आहेत) व ५ हजार नर्सेस आहेत. गेल्या वर्षी एकूण ६½ हजार दवाखान्यांतून ११½ कोटि लोकांस औषधपाणी मिळालें. संबंद हिंदुस्थानांत विश्वविद्यालयांस जोडलेलीं फक्त दहा डॉक्टरी शिकविणारीं कॉलेजें आहेत व उत्कृष्ट शिक्षणास पात्र अशी त्यांतील एकहि संस्था नाहीं! १९३९ सालीं हिंदुस्थानांत १५ लक्ष लोक मलेरियानें मेले व कॉलऱ्यास १ लक्ष लोक बळी पडले. देवींच्या साथीनें ५० हजारांचा प्राण घेतला. क्षयरोग फैलावत आहे. बहुसंख्य लोकांना फक्त स्वस्त कार्बोहैड्रेट अन्नच (साखर व स्टार्चेस) परवडतें; कांहीं आवश्यक अन्नद्रव्यें त्यांस मिळूं शकत नाहींत. बंगालमधील लोकसंख्या ५ कोटि आहे, परंतु रुग्णालयांत फक्त ६ हजारच खाटांची व्यवस्था आहे. गिरण्यांत काम करणाऱ्या मजुरांच्या आरोग्याबद्दल सरकार जवळ जवळ कांहींच जबाबदारी घेत नाहीं; ती गोष्ट कारखानदारांवर सोपवलेली दिसते. हिंदुस्थानांत आरोग्यरक्षणावर होणाऱ्या ३ कोटि डॉलर्सच्या खर्चाचाहि पुरा उपयोग होऊं शकत नाहीं. हिंदुस्थानाचा निरक्षरता कमी झाल्याविना आरोग्याबाबत खरी प्रगति होऊं शकणार नाहीं."

### कारखान्यांच्या सक्तीच्या विम्याची मुदतवाढ

दोन वर्षांपूर्वी हिंदुस्थान सरकारनें कारखान्यांच्या सक्तीच्या युद्धविषयक जोखमीच्या विम्याची योजना आखली, तिची मुदत मार्च, १९४४ अखेर संपत आहे. ह्या योजनेस अनुसरून सरकारनें आठ हप्त्यांत मिळून १६ कोटि रुपये वसूल केले, परंतु खर्चाचा आंकडा ७ लक्ष रुपयांवर गेलेला नाहीं. ह्या ७ लक्ष रुपयांपैकी, नुकसान भरपाईदाखल दिलेली रक्कम १ लक्ष रुपयेच भरेल; बाकीची रक्कम व्यवस्थेच्या खर्चास लागली. ज्या कारखान्यांनीं आठ हप्ते भरलेले आहेत, अशांकडून एप्रिल, १९४४ ते मार्च १९४५ ह्या बारा महिन्यांत आणखी हप्ते न घेतां, त्यांस विम्याचा फायदा मिळावा, असें फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्सनें सरकारास सुचविलें आहे व त्यासंबंधांत फेडरेशननें ऑस्ट्रेलियाचा दाखला दिला आहे. सर्व प्रातिनिधिक संस्थांचें म्हणणें विचारांत घेऊन सरकार आपला निर्णय जाहीर करील; परंतु जपानशीं चालू असलेलें युद्ध संपेपर्यंत विम्याची सक्ती रद्द होईल, अशी अपेक्षा करणें योग्य होणार नाहीं. विम्याचा हप्ता कमी होणें हें मात्र क्रमप्राप्त दिसतें.

### महाराजांचें पेट्रोल बंद

इंदूरचे महाराज ह्यांच्या मोटारीस लॉस एंजल्समध्येंच वापरण्यासाठी पेट्रोल दिलें असतां तें त्यांनीं (काडीमोड करून दुसरा विवाह करण्यासाठी) रेनोला जाण्याकरितां वापरलें, ह्याकरितां त्यांना एक वर्षभर पेट्रोल मिळणें बंद करण्यांत आलें. अर्थात्, महाराजांजवळ आणखी मोटारी असल्यामुळें, त्यांस पायी चालावें लागलें नाहीं.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.

नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,७९,२०० | रु. ३,३९,६०० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२०,५०,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंटः—एच्. ए. करीमभाई

## खारे काजू, मसालेदार काजू

सर्व तऱ्हेचा खास पिस्ता, सुका मेवा, अक्रोड, काळा खजूर, अंजीर वगैरे मिळतील.

द. ना. हेजीब

(२) १० शुक्रवार, पुणें.

## म्हैसूर संस्थानची ग्रामोद्धार योजना

( लि. आ. मा. )

हिंदुस्थानांतील एक प्रगमनशील संस्थान म्हणून म्हैसूर संस्थानचा लौकीक आहे. म्हैसूर संस्थानची औद्योगिक कामगिरी फार मोठी आहे. या संस्थाननें ग्रामोद्धाराच्या प्रश्नाकडेहि लक्ष दिलें असून त्याबाबत एक कार्यक्रमहि आंखला आहे.

ह्या संस्थानांत ग्रामपंचायती फार जुन्या आहेत. सन १९०४ सालापासूनच ग्रामोद्धार प्रश्नाकडे सरकारनें लक्ष दिलें आहे. सरकारला असें दिसून आलें कीं, खेडेगांवांतील पाण्याचीं तळीं सुधारणें, स्थानिक जंगलाचें काम करणें, यासाठी पंचायतींच्या कमिट्या नेमल्या पाहिजेत. यासाठी पंचायतींकडे खेडेगांवचें सर्व विधायक काम देऊन त्या स्वायत्त करण्याकडे प्रयत्न सुरू झाला.

१९२५ ते १९३५ या दहा वर्षांचे अवधींत सुमारें ११,००० पंचायती स्थापन झाल्या. प्रथम त्यांचेकडे असलेलें काम जरी आरोग्याबाबतचें असलें तरी पुढें त्यांकडे आर्थिक व खाजगी उन्नतीचे बाबत प्रयत्न करण्याचे सर्व अधिकार दिले आहेत.

सन १९३६ पासून ग्रामोद्धार योजनेस अनुसरून सरकारनें कांहीं खेडीं नमुनेदार म्हणून निवडून त्यांचें अनुकरण इतर खेडेगांवांनीं करावें असा प्रयत्न सुरू केला आणि अशीं सुमारें २२३ खेडीं निवडण्यांत आलीं.

ग्रामोद्धाराचें काम सरकारी अधिकारी यांचे मार्फत चालत असें व यामुळें निमसरकारी कार्यकर्ते या कार्यांत नसत. यासाठी सुमारें १३० निमसरकारी कार्यकर्ते नेमण्यांत आले.

ग्रामोद्धाराची ठोकळ योजना अशी कीं, संस्थानांतील ४० ते ५० खेडेगांवांचा एक गट असे गट करावयाचे. ५ वर्षांचे अवधींत ग्रामोद्धाराची संपूर्ण योजना अंमलांत आणतां येईल. ग्रामोद्धाराच्या योजनेसाठी अंदाजपत्रकांत १९४१।४२ सालासाठी दोन लाख रुपये राखून ठेवले होते यापैकीं ५० ते ६० हजार रुपये खर्च नोकरवर्गासाठी व बाकीची रक्कम पंचायतींना देणगीसाठी म्हणून उपयोगी पडावी, अशी योजना होती.

ग्रामोद्धार कामास उपयुक्त अशी माहिती मिळविण्याची व्यवस्था असून त्यांत खालील बाबींचा समावेश केला आहे.

( १ ) सर्वसाधारण ( लोकसंख्या, क्षेत्रफळ, घरें वगैरे.)

( २ ) जमिनी. ( यांत बागाईत, जिराईत, जनावरें, जंगलें, पाणीपुरवठा, जमीन धारण न करणारे रहिवाशी. )

( ३ ) आरोग्य, पाणीपुरवठा, वाहतुकीचीं साधनें, शिक्षण, शेती, वैद्यकीय मदतीचीं साधनें, उद्योगधंदे, व व्यापार, सहकारी संस्था, पंचायतीची कामकाजपद्धत वगैरे. ह्या सर्व प्रश्नांची माहिती मिळवून त्याप्रमाणें कामास सुरवात करावयाची. प्रत्येक गटासाठी एक समिति असून त्यामध्यें त्या भागाचे सरकारी अधिकारी सभासद असतात व यांच्या सभा महिन्यांतून एकदां होतात.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ★ | ★ | ★ | ★ | ★ | ★ | जुलै | सन १९४४ | | | | |
| ★ | ★ | आगस्ट | नोव्हेंबर | ★ | डिसेंबर | एप्रिल | | | | | |
| आक्टोबर | मे | फेब्रुवारी | मार्च | जून | सप्टेंबर | जानेवारी | | | | | |
| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | १ | ८ | १५ | २२ | २९ |
| सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | २ | ९ | १६ | २३ | ३० |
| मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | ३ | १० | १७ | २४ | ३१ |
| बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार | ४ | ११ | १८ | २५ | ★ |
| गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवा | बुधवार | ५ | १२ | १९ | २६ | ★ |
| शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | ६ | १३ | २० | २७ | ★ |
| शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | ७ | १४ | २१ | २८ | ★ |

( हें कॅलेंडर श्री. जी. टी. सोनार, क्लार्क, नंदुरबार को. म्यु. युनियन, ह्यांनीं तयार केलें आहे व लोकांच्या कामदारीं व्हावी, ह्यासाठी " अर्था "मध्यें प्रसिद्धीसाठी त्यांनीं पाठविलें आहे. )

मध्याच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे

**टोमॅटो केचप ( गोड ) व**

**टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]**

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

**रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें**

बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

**>। दत्त कंपनी ।<**

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ

सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर, रिपेअर करून मिळतील.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर नसन उपद्रव ... लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा ... पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमियम ... लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

**ट्रस्ट ऑफ इंडिया**

**विमा कंपनीच्या**

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

**ट्रस्ट ऑफ इंडिया**

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779




TELEGRAM Guest House Poona 2.

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.